# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

### शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल,जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com    दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.: विससं/उशि/कोविप/शिष्यवृत्ती/२०१६ 2823    दि. 3/10/16

**महत्वाचे व अति-तात्काळ**

**परिपत्रक**

**विषय:-केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागांतर्गत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७ च्या अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ: मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अपंग पीएमएस/२०१६-१७/११२०१, दि.३०.०९.२०१६.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्लीमार्फत अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उददेशाने अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण उपविभागासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी उच्च शिक्षण विभागाकडून होणे आवश्यक आहे. केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत **अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना सन २०१६-१७** साठी राज्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो केव्हाही सहजरित्या भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावरुन अर्ज मागविण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर माहिती, जाहिरात तसेच मार्गदर्शक सूचना व वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती मा. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत.

सदर शिष्यवृत्ती इयत्ता ११, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, डिग्री, डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमांसाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत थेट विद्यार्थ्यांचे आधार क्रमांकाशी संलग्न (Link) असलेल्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे आधार क्रमांक ज्या बँक खात्याशी संलग्न (Link) केलेला आहे तोच खाते क्रमांक अर्जामध्ये भरणे आवश्यक आहे. जर आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न (Link) केलेला नसेल तर तो संलग्न (Link) करण्यासाठी विद्यार्थ्याला मार्गदर्शन करणे हे प्राचार्य / संस्थाप्रमुखांची जबाबदारी आहे.

**योजनेच्या प्रमुख अटी:**

१. अर्जदार भारताचा रहिवासी असावा.
२. अर्जदाराची अपंगत्वाची टक्केवारी ४०% व त्यापुढील असावी.
३. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
५. त्याच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी आहे.
६. एका कुटुंबातील फक्त २ अपंग अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. विद्यार्थ्याचे स्वत:चे बँक खाते कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत असणे व ते त्याच्या आधार क्रमांकाशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे.

आवश्यक कागदपत्रे:

१. विद्यार्थ्याचा फोटो.
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची छायांकित प्रत.
३. पालकांचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
४. महाविद्यालयास चालु वर्षाची फि भरल्याची पावती.
५. बँक खाते पासबुकाच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.
६. विद्यार्थ्यांचा अपंगत्वाचा दाखला.
७. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.
८. आधार कार्ड छायांकित प्रत.

NSP २.० पोर्टलवरील मार्गदर्शक सूचनांनुसार रु.५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवणे व रु.५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जदारांनी त्यांची कागदपत्रे पोर्टलवर Upload करणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदपत्रे (महाविद्यालयांत जमा केलेली व पोर्टलवर Upload केलेली) तपासूनच पात्र अर्ज त्वरीत ऑनलाईन फॉरवर्ड करणे आवश्यक आहे व सदरची जबाबदारी पूर्णतः प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.

**सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्य / संस्था प्रमुख यांची असेल. आपल्या महाविद्यालयात / संस्थेत शिक्षण घेत असणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे आणि सदर शिष्यवृत्तीची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या / संस्थेच्या दर्शनी भागावर झळकविण्यात यावी. तसेच त्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून घेवून तसेच ते त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करुन घेण्यासही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.**

सदर शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात, अर्जाचा नमूना, मार्गदर्शक सूचना व वेळापत्रकासह www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर परिपत्रकाव्दारेही सोबत जोडण्यात येत आहे.

सोबतः वरील प्रमाणे.

RBkosday
4/10/16

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रति,

१. प्राचार्य/संस्था प्रमुख, सर्व अशासकीय अनुदानित व विना-अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये, जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.
२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई,
३. कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई

प्रतः मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.